**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः19.01.2025** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

1. देशभरातील 65 लाख ग्रामीण नागरिकांना मालमत्ता पत्रकाचं पंतप्रधानांच्या हस्ते वितरण

2. राजे एडवर्ड स्मृती रुग्णालयाचं शताब्दी वर्षात पदार्पण

3. दहावी-बारावी प्रवेशपत्रावरील जाती प्रवर्ग काढला

4. पालकमंत्र्यांची नियुक्ती जाहीर

5. राज्यातील गड किल्ल्यांवरील अतिक्रमण 31 मेपर्यंत काढण्याचं नियोजन

   आणि

6. खो-खो विश्वकरंडक स्पर्धेत भारतीय पुरुष-महिला संघ अंतिम फेरीत

**स्वामित्व**

स्वामित्व योजनेद्वारे देशातील जनतेच्या उत्पन्नात वाढ होत असून कायदेशीर सनदेच्या आधारे बँकेतून कर्जाद्वारे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांना मदत होईल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल व्यक्त केला. केंद्रीय ग्रामविकास आणि पंचायत राज मंत्रालयामार्फत दूरस्थ पद्धतीने स्वामित्व योजनेंतर्गत सनद वितरणाचा आरंभ करताना ते

बोलत होते. या कार्यक्रमात मुंबईतून राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालघर, रायगड, ठाणे जिल्ह्यातील लाभार्थी उपस्थित होते. देशातील गरीबी कमी करायची असेल तर प्रत्येक नागरिकाजवळ मालमत्तेचे अधिकार असणं गरजेचं आहे असं सांगून मोदी म्हणाले की, 2014 पासून आम्ही ड्रोनद्वारे सर्वेक्षण करून नागरिकांना मालमत्ता पत्रक वितरित करत आहोत. 98 टक्के भूमी अभिलेखांचं संगणकीकरण करण्यात आलं असल्याचं त्यांनी नमूद केलं. याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील सुमारे 60 लाखांहून अधिक कुटुंबांना या योजनेचा थेट फायदा होईल. ही योजना केवळ शासकीय उपक्रमापुरती मर्यादित नसून, आर्थिक सक्षमीकरणाची मोठी संधी ठरेल, असं त्यांनी सांगितलं. राज्याच्या विविध जिल्ह्यातील लाभार्थी या दूरस्थ कार्यक्रमात सहभागी झाल्याचं आमच्या प्रतिनिधींनी कळवलं आहे.

**मुंबई-एक तिकीट**

सार्वजनिक वाहतूक प्रणाली एका सिंगल मोबिलिटी प्लॅटफॉर्मवर आणण्याच्या दृष्टीनं मुंबईतील पायाभूत सुविधा विकसित करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सांगितलं. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत मुंबईतील एकात्मिक तिकीट सेवा प्रणालीवर चर्चा करताना ते बोलत होते. या उपक्रमामुळे प्रवाशांना केवळ 300 ते 500 मीटर चालून सार्वजनिक वाहतूक सुविधेचा लाभ घेता येईल. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं की, मुंबईत सध्या 3,500 लोकल सेवा कार्यरत आहेत. येत्या काळात आणखी 300 लोकल सेवा सुरू करण्यासाठी 17 हजार 107 कोटी रुपयांची गुंतवणूक रेल्वेकडून करण्यात येणार आहे.

**वैष्णव- बुलेट**

मुंबई अहमदाबाद हाय स्पीड बुलेट ट्रेनसाठी देशातील पहिल्याच समुद्राखालून जाणाऱ्या ठाण्याच्या शीळफाटा, घणसोली दरम्यान सात किलोमीटर लांबीच्या बोगद्याचं काम जवळपास पूर्णत्वास येत आहे.  या कामाची केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल पाहणी केली. हे काम अतिशय प्रगतीपथावर असल्याचं त्यांनी नंतर बातमीदारांशी बोलताना सांगितलं.

**केईएम**

राजे एडवर्ड स्मृती रुग्णालय ही मुंबईच्या सामाजिक जीवनातील महत्त्वाची सामाजिक संस्था असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल काढले. सेठ गोवर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय आणि राजे एडवर्ड स्मारक रुग्णालय शताब्दी वर्ष शुभारंभ कार्यक्रमात ते काल बोलत होते. संस्थेच्या कर्मचाऱ्यांसाठी 21 मजली इमारतीचं भूमिपूजन करण्यात आलं आहे, अशी माहिती त्यांनी दिली. या कार्यक्रमाला डॉक्टर्स,  प्राध्यापक तसंच विद्यार्थी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

**जात- बोर्डपत्रक**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीनं फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात आयोजित इयत्ता बारावी परीक्षा प्रवेश पत्रावरील जातीचा प्रवर्ग काढून टाकण्याचा निर्णय राज्य मंडळानं घेतला आहे. याबाबत विविध स्तरात नाराजी व्यक्त केल्यानंतर मंडळानं हा निर्णय घेतला असून दिलगिरीही व्यक्त केली आहे. नवीन प्रवेशपत्र 23 जानेवारीपासून उपलब्ध होतील. इयत्ता दहावीच्या प्रवेशपत्रातही हा बदल करण्यात

येणार असून त्याची प्रवेशपत्रं उद्या दुपारी तीन वाजल्यापासून संबंधित शाळांना उपलब्ध होतील.

**पालकमंत्री**

राज्यभरातील पालकमंत्र्यांच्या नियुक्तीचा शासन निर्णय काल जारी करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री असतील. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडं ठाणे आणि मुंबई शहर जिल्हा, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडं पुणे आणि बीड जिल्ह्याचं पालकमंत्री पद सोपविण्यात आलं आहे.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 11 वाजता आकाशवाणीवरील 'मन की बात' कार्यक्रमात देशवासियांसोबत आपले विचार मांडतील. मासिक रेडिओ कार्यक्रमाचा हा 118 वा भाग असेल.

**गडकिल्ले**

राज्यातल्या गड किल्ल्यांवरील अतिक्रमण काढण्यासाठी आणि नव्यानं  अतिक्रमणं होऊ नयेत याकरिता जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आल्याची माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी काल बातमीदारांना दिली. 31 मेपर्यंत या कार्यक्रमाचं नियोजन करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. ते म्हणाले...

## मराठा

मराठा मंडळाच्या कार्यात तरुण-तरुणींनी यायला हवं. तरुणांनी स्पर्धा परीक्षा, तसंच संरक्षण खात्यात परीक्षा देऊन पुढे गेलं पाहिजे. म्हणूनच मुंबईत मराठा भवन उभारण्यात येणार आहे असं अखिल मराठा फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश सुर्वे यांनी काल रत्नागिरी इथं सांगितलं. अखिल मराठा फेडरेशनच्या तिसऱ्या महासंमेलनाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. आपण नोकरी देणारे व्हायला हवं. आपण सर्वांनी कोणाच्या विरोधात नव्हे, तर राष्ट्राच्या प्रगतीसाठी एकत्र येऊ या असं आवाहन त्यांनी केलं. देशातल्या मराठा मंडळांचे प्रतिनिधी या  संमेलनाला आले असून, महाराष्ट्रातली 75 मराठा मंडळं महासंमेलनात सहभागी झाली आहेत, असं त्यांनी सांगितलं. या संमेलनात खासदार नारायण राणे यांना द ग्रेट मराठा पुरस्कार, ज्येष्ठ इतिहासकार डॉक्टर जयसिंगराव पवार यांना अखिल मराठा समाजरत्न पुरस्कार, अणुशास्त्रज्ञ डॉक्टर सुरेश हावरे यांना अखिल मराठा समाजभूषण पुरस्कार, तर आधुनिक इंजिनीअरिंग विषयातले तज्ज्ञ उमेश भुजबळराव यांना अखिल मराठा समाज गौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं.

## पत्रकार

देशातील पत्रकारितेमध्ये महाराष्ट्रातील पत्रकारितेचं वेगळं महत्व आहे. इथली पत्रकारिता आजही मूल्यांची जपणूक करताना दिसते, असे गौरवोद्गार जळगाव जिल्हा पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी यांनी काल काढले. महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र आणि प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीच्या बैठकीत समिती सदस्यांशी संवाद साधतांना ते बोलत होते. राज्य समितीचे अध्यक्ष यदु जोशी यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**पत्रकार-पुरस्कार**

वातावरणातील कार्बनडाय ऑक्साईडचं वाढतं प्रमाण चिंताजनक असल्याचा इशारा हवामान शास्त्रज्ञांनी दिला असल्यानं जीवसृष्टी वाचवण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याचं आवाहन राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी काल सोलापूर इथं केलं. पत्रकार दिनानिमित्त उत्तर सोलापूर तालुक्यातील गुणीजनांना पुरस्कार देण्याच्या कार्यक्रमात पटेल बोलत होते.

**सरस**

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद बीडद्वारा आयोजित बीड जिल्हास्तरीय सरस विक्री आणि प्रदर्शनाच्या तिसऱ्या दिवशी नागरिक आणि महिलांच्या प्रचंड प्रतिसादामुळं उमेद गटातील महिलांनी बनवलेल्या विविध पदार्थांची सुमारे लाख रुपयाची विक्री झाली आहे.

**कोठडी**

बीड जिल्ह्यातील मसाजोग इथले सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणातील सहा आरोपींना आता 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

**आदिवासी**

नेहरू युवा केन्द्र, केंद्रीय क्रीडा मंत्रालय आणि केंद्रीय राखीव पोलिस दलाद्वारे गडचिरोली जिल्ह्यातील 50 आदिवासी युवकांची तुकडी केरळ राज्यातील कोचीन इथं होणाऱ्या आदिवासी युवा आदान-प्रदान कार्यक्रमासाठी काल रवाना झाली. गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली,अहेरी आणि भामरागड या तीन दुर्गम आणि आदिवासीबहुल तालुक्यांमधील 450 आदिवासी युवक भारतातील 9 वेगवेगळ्या शहरांना भेट देणार आहेत. आदिवासी

तरुणांना भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची जाणीव करून देण्याचा या उपक्रमाचा हेतू आहे.

**खो-खो**

खो खो विश्वचषक स्पर्धेत, भारतीय पुरुष संघानं काल नवी दिल्लीत दक्षिण आफ्रिकेला 62-42 गुणांनी हरवून अंतिम फेरी गाठली. आता विजेतेपदासाठी त्यांचा सामना नेपाळसोबत होईल. तत्पूर्वी, भारतीय महिला संघानं विजयी घोडदौड सुरू ठेवत दक्षिण आफ्रिकेला 66-16 अशा फरकानं पराभूत केलं. आता भारतीय महिला संघ देखील अंतिम फेरीत नेपाळसोबत लढणार आहे.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**